# प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण,पुणे विभाग, पुणे

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सर्व्हे नं. १०४/१०५,
विश्रांतवाडी पोलीस स्टेशन समोर, आळंदी रोड, येरवडा, पुणे १५.
दुरध्वनी क्रमांक-020 -29703051 /29702310 E-mail -rdcswopune@gmail.com

---

जाक्र.प्राउआसकपुवि/शानिशा/आनापान प्रशिक्षण / २०२६-२७ / 1882 दि. 16/7/26

प्रति,
सहायक आयुक्त, समाज कल्याण,
पुणे,सातारा,सांगली,सोलापूर,कोल्हापूर

विषय : जुलै २०२६ च्या केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेत 'मित्र उपक्रम' अंतर्गत आयोजित आनापान साधना प्रशिक्षणास शासकीय निवासी शाळांतील मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शासकीय वसतिगृहांतील गृहप्रमुख/गृहपाल यांची अनिवार्य उपस्थिती सुनिश्चित करणेबाबत.

संदर्भ- : १. जा.क्र. राशैसंप्रपम/कला व क्रीडा/मित्र उपक्रम प्रशिक्षण/सन २०२६-२७/दि.२९ मे २०२६.
२. जा.क्र. आशिका/स्विस/मित्र उपक्रम/२०१९-२०२०/४८५६, दिनांक ०८ ऑगस्ट २०१९.
३. पुणे विपश्यना समिती, स्वारगेट यांचे पत्र दिनांक १४ जुलै २०२६.

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनामार्फत 'मित्र उपक्रम' (Mind In Training for Right Awareness) अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांच्या मानसिक, बौद्धिक व भावनिक विकासासाठी शासकीय निवासी शाळा व वसतिगृहांमध्ये आनापान साधना नियमितपणे राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सदर उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी **धम्मपुण्ण विपश्यना केंद्र व पुणे विपश्यना समिती यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यधाम आश्रम, कोंढवा बु., पुणे – ४८ येथे दिनांक ०५.०८.२०२६ रोजी वार बुधवार सकाळी १०.०० वाजता** विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.त्यानुषंगाने आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व शासकीय निवासी शाळांचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक तसेच शासकीय वसतिगृहांतील सर्व गृहप्रमुख/गृहपाल यांना तात्काळ सूचना देऊन खालील बाबींची काटेकोर अंमलबजावणी करावी.

1. शासकीय निवासी शाळेतील दैनंदिन कामकाज व विद्यार्थ्यांची सुरक्षा बाधित होणार नाही याची दक्षता घेऊन शाळेत आवश्यकतेनुसार किमान एक शिक्षक उपस्थित ठेवावा.
2. मुख्याध्यापकांसह इतर सर्व शिक्षकांनी सदर प्रशिक्षण कार्यशाळेस अनिवार्यपणे उपस्थित राहणे सुनिश्चित करावे.
3. सर्व गृहप्रमुख व गृहपाल यांनी देखील प्रशिक्षणास वेळेवर उपस्थित राहून पूर्ण वेळ सहभाग नोंदविणे सुनिश्चित करावे.
4. प्रशिक्षणानंतर सर्व निवासी शाळांमध्ये तसेच वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांकडून नियमितपणे आनापान साधनेचा सराव करून घेण्याबाबत संबंधितांना सूचना द्याव्यात.
5. प्रशिक्षणासाठी पात्र कोणताही अधिकारी/कर्मचारी अनुपस्थित राहणार नाही याची वैयक्तिक जबाबदारी संबंधित सहायक आयुक्त यांची राहील.
6. प्रशिक्षणास उपस्थितीबाबतचा संपूर्ण आढावा घेऊन आवश्यकतेनुसार अनुपस्थित कर्मचाऱ्यांविरुद्ध नियमानुसार कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.
7. सदर बाबीस अत्यंत महत्त्व देऊन आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व संबंधितांना तात्काळ सूचित करून प्रशिक्षणास १००% उपस्थिती सुनिश्चित करावी.

( पदमा कादुरे )
प्रादेशिक उपआयुक्त,
समाज कल्याण पुणे विभाग पुणे.

प्रत-कार्यवाहीस्तव
१. गृहप्रमुख/ गृहपाल शासकीय वसतिगृह सर्व
२. मुख्याध्यापक शासकीय निवासी शाळा सर्व